
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 8 | MAY - 2024

# भारतीय इतिहासातील राजगृह या स्थळाचे ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व

**प्रा. डॉ. नरवाडे जळबा मेश्राम**
**कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बदनापूर, जि. जालना.**

**प्रस्तावना :**



राजगीर या स्थळाचे अधिकृत नाव हे गिरीवराज हे बिहारमधील नालंदा जिल्ह्यातील एक शहर आणि अधिसूचित क्षेत्र आहे. बिहारची पाटणा ह्या शहरापासून १०० किमीवर आहे. राजगीर ही प्राचीन काळी मगध साम्राज्याची राजधानी होती. त्यानंतर मौर्य साम्राज्य उदयास आले. राजगरीचे ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व हे खुप मोठे आहे. वसुमतिपूर, वृहद्रथपूर, गिरिव्रज, कुशाग्रपूर आणि राजगृह या नावांनी सुद्धा हे प्रसिद्ध राहिले आहे. बौद्ध साहित्यानुसार बुद्धांची साधनाभूमी राजगीरमध्ये आहे. राजगरीर हेच २४ वे जैन तीर्थंकर वर्धमान महावीर यांचे पहिले देसना स्थळ सुद्धा आहे. राजगीरच्या आसपासच्या उदयगिरी, रत्नागिरी, विपुलगिरी, वैभारगिरी, सोनगिरी या टेकड्यांवर जैनांची मंदिरे आहेत. त्यांचे तीर्थंकर महावीर यांनी ज्ञानप्राप्तींनतरचे पहिले प्रवचन विपुलगिरी टेकडीवर केले होते. राजगीरच्या आसपास जैनांची २६ मंदिरे आहेत. परंतु येथे जाणाऱ्या वाटा चालायला अवघड असल्याने तेथे पोहोचणे सोपे नाही. याच राजगीरमध्ये भीम आणि जरासंध यांचे मल्लयुद्ध झाले.

राजगृह म्हणजे राजांचे घर. प्राचीन काळातील सोळा भारतीय जनपदांपैकी राजगीर एक होते. त्यास त्यावेळी राजगृह म्हटले जायचे. या ठिकाणी मगध वंशाचे शक्तीशाली राजे बिंबिसार यांचे शासन होते. राजा बिंबीसार यांनी आपले आवडते उद्याने वेळुवन विहार तथागत बुद्धास दान दिले होते. बिंबिसाराचा पुत्र अजात शत्रू तो मोठा साम्राज्यवादी होता. त्याने बापाला कैद करून राज्य मिळवले. अजातशत्रूला त्याचा पुत्र उदायी याने कट कारस्थान करून ठार मारून आपले नगर वसले. उदायीचा अंतही कुट कारस्थानातूनच झाला, अशाप्रकारे हर्यक वंशी नागराजांचे मगधावरचे स्वामित्व समाप्त झाले. तिथून पुढे मगधावर शिशुनाथ वंशाची सत्ता आली; पण त्यालाही फार काळ राज्य करता आले नाही. त्यानंतर मगधावर नंद वंशाचे राज्य आले. त्या वंशातील महापद्य नंद याने अनेक राज्ये जिंकून आपले एकछत्री साम्राज्य उभे केले.[१] याच ठिकाणी भन्ते सब्बमलपुत्त अरहंत झाले होते. महाराणी खेमा भिक्खुणी झाली होती. तथागत बुद्धाचा चुलत भाऊ देवदत्त याने तथागत बुद्धांवर केलेल्या प्राणघातक हल्ल्याचे स्थान देखील राजगृह हेच आहे. गृधकुट पर्वतावरुन मोठा दगड देवदत्ताने भगवान बुद्धांच्या अंगावर ढकलून दिला होता, परंतु तो दगड तथागतांच्या पायाच्या बोटाला किरकोळ नुकसान करून दूर जाऊन पडला होता. देवदत्ताने चुगली करून अजातशुत्रच्या मनात तथागत बुद्ध व वडील बिंबीसार यांच्याविषयी द्वेष निर्माण केला होता. राजा बिंबीसार यांची हत्या त्यांचा मुलगा अजाशत्रूने केली. यानंतर उदयचा मुलगा महामुंडने उदयची हत्या केली. पितृहत्येचे पाप याच जन्मात सर्वांनी भोगल. लिच्छवींनी जेव्हा दुष्काळ निवारणासाठी तथागतास वैशाली मध्ये बोलावले तेव्हा तथागत बुद्धांना त्रास होऊ नये म्हणून राजगृह ते गंगा तटापर्यंत रस्ता राजा बिंबीसार यांनी बनवला होता. आज या मार्गास बिंबीसार मार्ग या नावाने ओळखतात. येथेच ते कारागृह आहे ज्यामध्ये राजा बिंबीसार यांना आजातशत्रुने कैद केले होते. तथागत बुद्धाचे चुलत भाऊ देवदत्त यांना भिक्खू बनताना बुद्धासारखी प्रतिष्ठा मिळवण्याची खुप लालसा होती. आपल्या महत्त्वकांक्षामध्ये असफल झाल्यावर त्याच्या मनामध्ये घृणा व तिरस्काराने जन्म घेतला. त्यामुळे देवदत्त तथागत बुद्धाच्या विरोधात क्रूर करवाया करत राहिला. राजगीर मधील नवीन स्थानास नवीन राजगीर सुद्धा म्हणतात. चीनी बौद्ध यात्री फाहियान यांच्या मतानुसार नवीन राजगरीच्या निर्मिती राजा आजातशत्रू यांनी केली होती. वर्तमान काळात याचे भग्न अवशेष पहावयास मिळतात. सरस्वती नदीच्या पलीकडे सम्राट अशोक यांनी पश्चिमेस स्तुप बनविला होता.

पश्चिमेस तीन मीटर खोदकाम केल्यानंतर येथे मौर्य शैलीच्या वीटा व लघुस्तुप सापडले होते. वैभारगिरी पहाडीच्या पूर्वेस उतारावर जी गुहा आहे तीला पिपलगुहा असे म्हणतात. तथागत बुद्धाचे प्रमुख शिष्य भन्ते महाकाश्यप येथेच निवास करत होते, जे प्रथम बौद्ध संगितीचे अध्यक्ष होते. या ठिकाणी सप्तपर्णी गुहेमध्ये प्रथम धम्म संगिती झाली होती. गृधकुट पर्वताजवळील छटागीरी पर्वतासमीप जीवक आम्रवन विहार आपणास बघावयास मिळतो. हे आम्रवन राजवैद्य जीवक यांनी तथागत बुद्धास दान दिले होते. तथागत बुद्ध यांच्या प्रती आपली असीम श्रद्धा

व्यक्त करण्यासाठी राजगीरच्या पहाडीवर जपानद्वारा निर्मित भव्य शांती स्तूप आहे. वैभार पर्वताच्या दक्षिणेतील गुहांना सोनभंडार गुहा म्हणतात. या ठिकाणी मगध राज्याचा स्वर्ण व राजकोश सुरक्षित ठेवला जात होतो. मुख्य मार्गापासून दक्षिणेस एक किमी दूर विटांचे प्राचीन भवन आहे यास मणीहार मठ असे म्हणतात. मणीहार मठ हे बुद्ध कालीन भिक्खू निवास स्थान होते. ही जागा नागवंशिय लोकांसाठी पूजनीय होती. याच ठिकाणी उत्खनन होऊन अनेक शिल्प व नागप्रतिमा मिळाल्या आहेत. या ठिकाणी तथागत बुद्धाने अनेक महत्त्वपूर्ण उपदेश दिलेले आहेत. त्यांचे हे उपदेश सामाजिक, आर्थिक, अध्यात्मिक, ऐतिहासिक, तात्विक अशा विविध विषयांना स्पर्श करणारे होते.

राजगृह भूतकाळातील प्रेरणादायी आठवणी जपण्यासाठी राजधानी आपल्या स्वतंत्र राष्ट्राच्या बिहार राज्याच्या सध्याच्या राजधानीचे नाव पाटना आहे. प्राचीन काळी या पाटण्याचे नाव पाटीग्राम असे होते. जे नंतर मगध साम्राज्याची राजधानी म्हणून पाटलीपुत्र म्हणून प्रसिद्ध झाले. सध्या राजगीर नावाचे शहर सध्याच्या पाटण्यापासून १०० किलोमीटर आग्नेयेस स्थित आहे. इ.स.पू. सहाव्या शतकात पाटलीपुत्रची राजधानी होण्यापूर्वीच, इतिहासात राजगृह म्हणून ओळखले जाणारे हे शहर नंतर इतिहासाच्या पानांत मगध राज्याची शक्तीशाली राजधानी म्हणून उदयास आले. भूतकाळातील या राजधानी राजगृहातील किल्ले, राजवाडे, निवासस्थाने आणि इतर वास्तू आता खंडित होऊन भग्नावस्थेत आपले अस्तित्व टिकवून आहेत किंवा भूमीच्या गर्भात शिरल्या आहेत. तरीही शहराचे इकडे-तिकडे तुटलेले स्वरूप, जमिनीतून बाहेर पडण्याचा अयशस्वी प्रयत्न करणाऱ्या प्राचीन इमारतींच्या दगडी भिंती, जुन्या पुष्करिणींचे अवशेष आणि उद्याने, गुहा, निर्जन टेकड्या आणि इतर अवशेष तत्कालीन राजगृहाची गौरव गाथा सांगताना दिसतात.[२]

### शोध विषयाची उद्दिष्ट्ये :

१) ऐतिहासिक दृष्टीने राजगृह अतिशय प्राचीन आहे, ही ऐतिहासिकता सुस्पष्ट करणे.

२) राजगृहाच्या महत्त्वपूर्ण घटनांचे वर्णन तिपीटक साहित्यातील विविध ग्रंथात व गाथांमध्ये पहावयास मिळते या सर्व घटकांने सुसूत्रीकरण करणे.

३) तथागत बुद्धांनी राजगृहामध्ये वास्तव्य करून विविध धम्म उपदेश केले आहे, या सर्व धम्म उपदेशांचे व तत्तज्ञानाचे संकलन करणे.

४) तत्कालीन भारताची सामाजिक व धार्मिक परिस्थीचे विश्लेषण करणे.

५) सध्या राजगृहात असलेल्या विविध भग्नावशेष, स्तुप, विहार, राजकीय पुष्करणी यांचा इतिहास स्पष्ट करणे.

### शोध विषयाचे महत्त्व :

राजगृह हे ठिकाणी पालि साहित्यामध्ये, बुद्ध उपदेशामध्ये, ऐतिहासिकतेच्या संदर्भात विविध दृष्टीने महत्त्वपूर्ण असल्याचे दिसून येते. कारण याच ठिकाणी तथागत बुद्धांचे महान शिष्य सारिपुत्त आणि महामौग्गलायन यांनी बौद्ध धर्म स्वीकारला होता आणि जिथे तथागत बुद्धांनी जंगली हत्तीलाही वश केले होते. या ठिकाणरी शांत हवा आणि थंड पाणी भरपूर होते. ध्यानाच्या सरावासाठी हे स्थळ महत्त्वपूर्ण समजल्या जात होते. याच ठिकाणी तथागत बुद्धांनी ज्ञान प्राप्तीनंतर प्रथम पावसाळी वर्षावास केला होता. तथागत बुद्धाचा प्रवासही राजगृहापासून सुरु झाला होता, जो कुशीनगरमध्ये महापरिनिब्बाणाने संपला होता.

राजगृह ज्या डोंगराने वेढलेले आहे. त्यावर उंच शिखरावर गृधकुट पर्वत आहे. भ. बुद्धाचे हे प्रिय स्थान होते. येथे त्यांनी पुष्कळ आणि मुख्य उपदेश दिलेले आहेत. डोंगराच्या शिखरावर थोड्याश्या दूरवर छोट्या छोट्या गुंफा आहेत. ज्यामध्ये भिक्षु राहत असत. आनंदाची गुंफा डोंगराच्या शिखराला भिडलेली होती. त्यांच्या खाली दोन गुंफा आहेत. ह्युवन त्सॉगच्या म्हणण्याप्रमाणे येथे दोन स्तूप होते.[३]

***"तेन खो पन समयेन भगवा गिज्झकूटस्स पब्बतस्स छायायं चङ्कमति। अख खो देवदत्तो गिज्झकूटं पब्बतं अभिरुहित्वा महतिं सिलं पविज्झि- इमाय समणं गोतमं जीविता वेरोपेस्सामी ति। द्वे पब्बतकूटा समागन्त्वा तं सिलं सम्पटिच्छिंसु। ततो पपतिका उप्पतित्वा भगवतो पादे रुहिरं उप्पादेसि। अथ खो भगवा उद्धं उल्लोकेत्वा देवदत्तं एतदवोच-"बहुं तया मोघपुरुरिस, अपुञ्ञं पसुतं, यं त्वं दुट्टचित्तो वधकचित्तो तथागतस्स रुहिरं उप्पादेसी" ति। अथ खो भगवा भिक्खू आमन्तेसि- 'इदं, भिक्खवे, देवदत्तेन पठमं आनन्तरियं कम्मं उपचित्तं, यं दुट्टचित्तेन वधकचित्तेन तथागतस्स रुहिरं उप्पादितं ति।"***[४]

'त्या समयी तथागत बुद्ध गृध्रकूट पर्वताच्या छायेत फिरत होते. तेव्हा देवदत्ताने गृध्रकूट पर्वतावर चढून याने गौतमाला जीवे मारीन' असा विचार करुन एक मोठी शिला फेकली. दोन वर्ततकूटांना अडकून ती शिला थांबली. तिच्यातून उडालेली दगडाची चिपळी लागल्यामुळे तथागतांच्या पायातून रक्त निघू लागले. तेव्हा तथागतांनी वर पाहून देवदत्ताला म्हटले, 'मोघ पुरुष, तू फार अपूण्य कमवलेस. कारण तू द्वेषयुक्त चित्ताने तथागतांचे रक्त काढलेस.' तेव्हा तथागतांनी भिक्खुंना संबोधीत केले, 'भिक्खुंनो, देवदत्ताने हे पहिले आनन्तर्य निर्वाणाला बाधक कर्म जमा केले आहे. कारण की द्वेषयुक्त चित्ताने, वधयुक्त चित्ताने तथागतांचे रक्त काढले.'[५] इतिहासकारांच्या मते, तथागत बुद्ध जेव्हा येथे धम्माचा प्रचार करत होते, तेव्हा येथे हॅयक राजवंश राज्य करीत होता. बुद्धाच्या समकालीन असलेल्या मगधचा राजा बिंबिसार याने शिशुनाग किंवा हर्यक वंशातील राजांची जुनी राजधानी गिरीवृज सोडली आणि त्याच्या जवळ नवीन राजधानी स्थापन केली. पूर्वी गिरीवृजाच्या जुन्या शहराबाहेर त्यांनी आपले राजवाडे बांधले होते जे राजगृह म्हणून प्रसिद्ध झाले. अनेक श्रीमंत नागरिकांच्या वस्तीमुळे राजगृह नावाने नवीन शहर वसले होते. महाभारताच्या वेळी जरासंधाची राजधानी गिरिव्रज येथेच राहिली होती. राजगृहाजवळील जंगलात जरासंधाची बैठक नावाची बारादरी असून ती

महाभारतातील असल्याचे सांगितले जाते. महाभारत वनपर्वात राजगृहाचा उल्लेख आहे. त्यामुळे महाभारताचा हा प्रसंग बौद्ध काळातील असल्याचे समजते. महाभारत काळात राजगृह हे तीर्थक्षेत्र मानले जात होते. मणिनाग तीर्थ हे राजगृहाच्या अधिपत्याखाली होते अशही पुढील संदर्भावरून माहिती मिळते. तत्कालीन बौद्ध जातकांमध्येही राजगृहाचा उल्लेख अनेक वेळा आला आलेला आहे. मगध देशात राजगृह वसले होते असा उल्लेख मंगलजातकातही आढळतो. राजगृहाची ती ठिकाणे जी बुद्धाच्या काळात अस्तित्वात होती आणि ज्यांच्याशी त्यांचा संबंध होता. पाचव्या शतकात भारताला भेट देणाऱ्या चिनी यात्रेकरु फाहीयान यांनी आपल्या प्रवासवर्णनात लिहिले आहे की, राजगीर पर्वताच्या सीमेवर बिंबिसाराचा पुत्र अजातशत्रू याने राजगृह शहर वसवले होते. जैन ग्रंथ सुत्र कृतांग राजगृहाचे वर्णन समृद्ध, श्रीमंत आणि आनंदी स्त्री-पुरुषांचे शहर असे करते. अंताकृत दसांग या जैन ग्रंथात राजगृहातील फुलांच्या बागांचा उल्लेख आहे. यासोबतच यक्ष मुदगरपाणि मंदिराची दुरावस्थाही सांगितली आहे. तथागत बुद्धांचा संबंध म्हणून वर्णन केलेल्या राजगृहातील अनेक ठिकाणांचे वर्णनही युवानच्वाँग यांनी केले आहे. वाल्मिकी रामायनात गिरीव्रजाच्या पाच टेकड्या आणि सुमागधी नावाच्या नदीच्या उल्लेख आहे. जैन कल्पसूत्रानुसार महावीरांनी चौदा वर्षे राजगृहात घालवली. बौद्ध धर्माच्या मान्यतेनुसार वैभारगिरीच्या टेकडीवर पहिले बौद्ध संम्मेलन झाले. या संम्मेलनात पालि साहित्याचा तिपिटक हा विशेष ग्रंथ तयार करण्यात आला. अशा अनेक दृष्टीने प्रस्तुत विषय महत्त्वपूर्ण असल्यामुळे या विषयाचे एक ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक, राजकीय अशा विविध दृष्टीने विशेष असे महत्त्व आहे.

राजगृह मगध राज्याची प्राचीन राजधानी होती. ज्याला गिरिव्रज पण म्हणतात. याच्यापुढे जैन परंपरामध्ये ही राजगृहाचे महत्त्व विस्ताराचा उल्लेख मिळतो. प्राप्त माहितीच्या अनुसार महावीराने येथे उल्लेख मिळतो. प्राप्त माहितीच्या अनुसार महावरीने चार्तुमास व्यतीत केले. विनयपिटकाच्या अनुसार ह्या नगराचे एक द्वार होते, जे सांयकाळी बंद केले जात होते. यानंतर कोणालाही नगरामध्ये प्रवेश करण्यासाठी आज्ञा नव्हती. राजगृहामध्ये सगळ रमणीय होते. येथील आराम, वन, भुमि आणि पुस्करीणी याची प्रशंसा केली गेली. पालि संदर्भामध्ये राजगृहामध्ये आतमध्ये आणि बाहेर अनेक मनोरम ठिकाणी आहेत, जसे कलन्दक निवाप विहार, शालवन, जीवक आम्रवन, विम्पलीगुहा, उदुम्बरिकाराम, मोरनिवाप, परिब्बाजकाराम, तपोदाराम इन्दसालगृहा, सत्तपण्णीगृहा, लट्ठिपन, मद्यकुच्छि, मिगदाय, सुपतिट्ठचेतिय, पासाणक चेतिय, सप्पसोणडिक ब्बहार, आणि सुमागधा नावाचे सरोवर इत्यादी. चर्चा प्राप्त होते. मज्झिमनिकायातील इसिगिली सुत्तामध्ये राजगृहाच्या जवळ असलेले पर्वत, वैभारपर्वत, इत्यादी पर्वतांचा उल्लेख प्राप्त होतो. याचे सुत्तामध्ये एक माहिती मिळते की, ऐके वेळी पाचशे प्रत्येक बुद्धांनी इसिगिली पर्वतावर निवास केला होता.[६]

### शोध विषयाची आवश्यकता :

राजजगीर आणि गृधकुट ही ठिकाणे केवळ तथागत बुद्धांची आवडती ठिकाणे म्हणूनच महत्त्वाची नाहीत तर बुद्धाच्या जीवनातील अनेक महत्त्वाच्या घटनांशीही ती संबंधीत आहेत. तथागत बुद्धांचे आवडते शिष्य आनंद यांच्या मते तथागतांच्या महापरिनिर्वाणासाठी गृधकुट हे अत्यंत योग्य ठिकाण आहे. बौद्ध धम्मात ते त्रिशरण आहे त्यातल्या संघासाठी बौद्ध मठ असावा या कल्पनेचा उगम याच ठिकाणी झाला. बौद्ध विहाराच्या कल्पनेतूनच उत्तम प्रकारची बौद्ध धर्मीय शिक्षणाची आणि धार्मिकतेची केंद्र उभी राहिली. या केंद्रामधून पुढे शिस्तबुद्ध आचरणाचे विद्वान आणि संन्यासी निर्माण झाले. भिक्खूंच्या आचरणासाठी इथे नियम बनविण्यात आले. त्यामध्ये भिक्खूंनी गाणे ऐकू नये आणि गाऊही नये. केस वाढवू नयेत, गळयात अथवा कमरेला धागा बांधू नये. एखादा चमत्कार करून दाखवू नये इत्यादी नियम येथे तयार करण्यात आले. राजा बिंबीसार यांनी तथागत बुद्धांना जे वेणूवन दान दिले होते त्या वेळूवनात तथागतांचा एक विशाल पुतळा आहे. असेच आम्रवन राजवैद्य जीवक याने बुद्धांना दान दिले होते. जीवक हा राजा बिंबीसार आणि राजा अजातशत्रू यांच्या दरबारात राजवैद्य होता. त्याने या आम्रवनात एक विहार बांधून दिला होता. त्याला जीवकाचे आम्रवन असे म्हणतात. राजगीर हे असंख्य सांस्कृतिक अवशेषांचे ठिकाण आहे. राजगीरांचे पंचक्रोशी प्राचीन अवशेषांनी समृद्ध आहे. पुरातत्त्वांच्या अभ्यासकांना हे ठिकाण नेहमीच खुणावत असते. अलीकडच्या काळात राजगीचा विस्तृत अभ्यास करण्यात आला आहे.

राजगृहात सहा प्रमुख धर्माचार्यांचे वास्तव्य होते. त्यांची नावे पुरण काश्यप, मक्खली गोसाल, अजित केशकंबल, ज्ञानी कात्यायन, निंगठनाथपुत्त आणि संजय बेलट्ठीपुत्त अशी होती. त्या धर्म आचार्यांना त्या काळातील सोळा जिल्ह्यात बरीच ओळख होती. सामान्य जनतेशिवाय अनेक राजेही त्यांचे शिष्य होती. तथागत बुद्ध आणि महावीर यांनीही त्यांचा बहुतांश वेळ राजगृह येथे घालविला.[७]

अशाप्रकारे भारतीय इतिहासात राजगृह नगरीचे स्थान हे अद्वितीय स्वरूपाचे आहे. या ठिकाणी खूप मोठे ऐतिहासिक, अध्यात्मिक, धार्मिक, सांस्कृतिक, भौगोलिक, राजकीय अशा अनेक प्रकारच्या घडामोडी झाल्याचे स्पष्ट होते.

राजगीरचा संबंध जसा तथागत बुद्धांशी आला तसाच तो भगवान महावीरांशीही आलेला आहे. राजगीरच्या परिसरातील विपुल जैन मंदिरे त्याची साक्ष देतात. इथल्या अनेक पहाडांवर जैन मंदिरे बांधलेली आहेत. ती बरीच प्राचीनही आहेत. त्यामुळे राजगीरला बौद्ध धर्मीय अनुयायांप्रमाणे जैनधर्मीय तीर्थयात्रीही सतत येत असतात. भगवान महावीर यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा काळ राजगीरच्या परिसरात गेलेला आहे. भगवान महावीर हे जैनांचे चोविसावे तीर्थंकर आहेत. जैन धर्माला वैशिष्ट्येपूर्ण तत्त्वज्ञान देणारे महान तत्त्वज्ञ ते आहेत. त्यांनी आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी आयुष्यातील ३२ वर्षे कठोर तपश्चर्या केली. त्यांच्या ३२ वर्षातील या सन्सस्त जीवनापैकी १६ वर्षे राजगीर आणि नालंदाच्या परिसरात व्यतीत झाली. तत्कालीन राजगीर नगरीतील अनेक महाजन हे भगवान महावीर यांचे समर्थक होते. त्यामुळे राजगीर

ही बौद्धांप्रमाणे जैनांनाही धर्मभूमी झालेली आहे. राजगीरजवळ असलेल्या विपुलांचल पर्वतावर भगवान महावीरांनी आपला पहिला धर्म उपदेश दिला. त्याचे स्मरण म्हणून विपुलांचल पर्वतावर ७२ फूट उंचीचे समाशरण जैन मंदिर उभारण्यात आलेले आहे. जैन धर्मीय मंडळींच्या दृष्टीने हे पवित्र तीर्थस्थान झाले आहे. राजगीरजवळच्या डोंगर-टेकड्यांवर जवळपास २६ जैन मंदिरे आहेत.

सम्राट अशोकाचा मृत्यू देखील राजगीर जवळच्या पर्वतरांगामधील एका शिखरावर झाला असून त्या ठिकाणी एक स्तूप उभारण्यात आला आहे. एका वैभवशाली प्राचीन साम्राज्याची राजधानी असलेल्या राजगृह तथा राजगीर नगरीला तटबंदी उभारून सुरक्षित करण्यात आले होते. त्यातल्या तटबंदीचे अवशेष काही प्रमाणात आजही पहायला मिळतात. या प्राचीन नगरातील अवशेषांचे शास्त्रीय पद्धतीने उत्खनन करण्याचे ब्रिटीश सरकारने ठरविले आणि ती जबाबदारी अलेक्झांडर कनिंघम या अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली. अलेक्झांडर कनिंघम यांच्या नेतृत्वाखाली उत्खनन पथकाने इ.स. १९०५ साली पहिले उत्खनन केले. त्यात पुरातत्वीय दृष्टीने महत्त्वाचे अनेक अवशेष सापडले. त्यांच्याद्वारे राजगीरचा इतिहास आणि सांस्कृतिक धार्मिक जीवन यावर चांगलाच प्रकाश पडला. त्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात इ.स. १९५० साली श्री. अमलानंद घोष यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा उत्खनन करण्यात आले. त्यावेळीही अनेक अवशेष आढळले. त्यांच्या आधारे या विषयातील तज्ञांनी राजगीरच्या सुसंगत इतिहासची मांडणी केली. उत्खननात जे अवशेष सापडले त्यात तटबंदीपासून दोन किलोमीटर अंतरावर सापडलेला मणियार मठ आणि त्यातील सर्प देवतेची मूर्ती अत्यंत महत्त्वाची मानावी लागेल. मणियार मठात ही नागदेवतेची मूती आढळली. राजगीरची ग्रामदेवता असलेल्या मणिनागाचे हे मंदिर आहे. वैदिक धर्मपरंपरेपासून वेगळे असलेल्या आदिम जमातींमध्ये नाग पूजेलाव नागदेवतेला वेगळेच महत्त्व आहे. मगधातील लोक नाग देवतेला उदार देवता मानत. नाग देवतेची पूजा केली म्हणजे ती देवता चांगला पाऊस पाडते अशी त्यांची लोकधारणा असावी. मणियार मठाच्या उत्खननात मिळालेल्या पात्रांचे आकार सर्पाकृती सदृश्य, नागाच्या फण्याशी साधर्म्य दाखविणारे आहेत. या पात्रांमध्ये नागदेवतेला दूध अर्पण केले जात असावे. त्यामुळे राजगीर वैदिक धर्म परंपरेबरोबरच आदिम धर्माचे देखील तीर्थस्थान असल्याचे मणियार मठावरून सिद्ध होते. बौद्ध आणि जैन या तत्कालीन अवैदिक परंपराही इथे रुजल्या होत्याच. राजगीरजवळ गार आणि गरम पाण्याचे झरे आहेत. त्यांना कुंड असे म्हणतात. गरम आणि गार पाण्याची अनेक कुंडे इथे असून आता ती केवळ भूगोलाचा चमत्कार न राहता तीर्थस्थळे बनली आहेत. त्यापैकी ब्रह्मकुंड, व्यासकुंड, सप्तधारा, गंगा यमुनाकुंड ही अधिक प्रसिद्ध आहेत. तिथे पर्यटकांची नेहमीच वर्दळ असते. अशा अनेक अंगाने महत्त्वपूर्ण असलेल्या बुद्धकालीन राजगीरचे महत्त्व हे सर्वच स्तरावर महत्त्वपूर्ण आहे. प्रस्तुत विषयावर संशोधनाची आवश्यकता ही तिपिटकातील तथागत बुद्धांचे अनेक उपदेश आणि सुत्तांचा संबंध हा राजगीरशी आहे. त्यातून तत्कालीन राजगीरची माहिती आणि आधुनिक राजगीरचे धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, भौगोलिक, ऐतिहासिक अशा विविध दृष्टीकोनातून महत्त्व असल्यामुळे या विषयावर स्वतंत्र संशोधन करण्याची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) गायधनी, र. ना., राहुरकर, व. ग., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास. विजयानगर, पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पृ.क्र. ११२.

२) जुगल किशोर बौद्ध. मगध साम्राज्य की ऐतिहासिक राजधानी राजगृह. ३२/३ क्लब रोड, पश्चिमपुरी चौक, नई दिल्ली : सम्यक प्रकाशन, प्रथम संस्करण २००३. पृ.क्र. २१.

३) लालचन्द ॲण्ड संस. नवीन पर्यटक गाईड. दिल्ली : प्रकाशक लालचन्द एण्ड संस १६ दरिया रोज, नई दिल्ली, पृ.क्र. १२.

४) कस्सप, जगदीस. (अनु.संपा.). विनयपिटके, चुल्लवग्गपालि, लोहितुप्पादकम्मं. नवनालन्दा बिहार : नालन्दा देवनागरी पालि गन्थमालाय, बिहारराजकीयेन पालिपकासनमण्डलेन पकासिता. प्रथम संस्करण १९५६, पुनर्मुद्रण २०१७. पृ.क्र. २९३.

५) शास्त्री, द्वारिकादास. (अनु.संपा.). मज्झिमनिकायपाली. वाराणसी : प्रकाशक बौद्ध भारती वाराणसी, पृ.क्र. १३-१४

६) त्रिवेदी, कृष्णकान्त. प्राचीन पाली साहित्य में भारतीय समाज. वाराणसी : प्रकाशक किशोर विद्या निकेतन, भदैनी, वाराणसी पृ.क्र. ५४-५५.

७) जुगल किशोर बौद्ध. मगध साम्राज्य की ऐतिहासिक राजधानी राजगृह. ३२/३ क्लब रोड, पश्चिमपुरी चौक, नई दिल्ली : सम्यक प्रकाशन, प्रथम संस्करण २००३. पृ.क्र. २५.